वीर बाजीप्रभू क्रीडा व व्यायाम मंडळ, बेलोरा द्वारा संचालित

# छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय

## आसेगाव पूर्णा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती कायम संलग्नित व महाराष्ट्र शासन व यु.जी.सी., नवी दिल्ली द्वारा मान्यता प्राप्त

नॅक द्वारे 'ब' ग्रेड प्राप्त

Website :www.cskmasegaon.org, Emall Address : ,scsam172@sgbau.ac.in

महाविद्यालय संख्या :- १७२

डॉ. हनुमंत रा. लुंगे,
प्राचार्य

फोन नं. कार्यालय : ०७२२७-२२७५८९

मो. ९४२३४२४९५०

जावक क्र.CSKM/ ९४२/२०२२ दिनांक :-०६/१०/२०२२

प्रति,
मा. कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विदयापीठ,
अमरावती

विषय : - वार्षिक अहवाल २०२१ -२२ (मराठी व इंग्रजी) करीता विहीत प्रपत्रात माहीती स्विकारण्याबाबत --

संदर्भ :- आपले पत्र क्र.संगाबाअवि/७-ड/वा.अ./३८६/२०२२ .दि. १४/०९/२०२२ नुसार

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, दि.०१/जुलै/२०२१ ते ३०/जुन/२०२२ या कालावधीचा वार्षिक अहवाल । बाबतची माहीती सोबत जोडलेल्या प्रपत्रात माहीती पाठविण्यात येत आहे तरी ती माहीती स्विकारण्यात यावी.ही विनंती.

सहपत्र :- माहीती प्रपत्र

७/१०/२२
आवक लिपिक
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्राचार्य
छत्रपति शिवाजी कला महाविद्यालय
आसेगांव पूर्णा,
ता. चांदूर बाजार, जि.अमरावती

## 2) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व त्याची माहीती

| अ क्र | महाविद्यालयाचे नांव व स्थापना वर्ष | नॅक/एम.बी.ए.व्दारा मानांकीत श्रेणी | प्राचार्याचे नांव व शैक्षणिक पात्रता | एकुण शिक्षक | एकुण शिक्षकेत्तर कर्मचारी | विद्याशाखा | विद्याशाखानिहाय विद्यार्थ्यांची संख्या | राष्ट्रीय छात्र सेनेतील विद्यार्थी संख्या | राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी संख्या | वस्तीगहातील विद्यार्थी संख्या | अपंग विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | छत्रपती शिवाती कला महाविद्यालय. आसेगांव पुर्णा ता. चांदुर बाजार जि. अमरावती. १९९९-२००० | बि.(B) श्रेणी | डॉ. हनुमंत रा. लुंगे.बि एस सी.(अॅग्री) एम पी एड,डि.वाय.एड.पीएच.डी. | ८ | ६ | कला ( बिए ) | ३८१ | ० | ० | ० | ० |

## ३) २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रातिल विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी ,विद्यार्थिची संख्या

| अ क्र | म.वि. नांव | प्रवेशित | | वांडम:यव समाजविज्ञान | | वाणिज्य | | गृहविज्ञान | | विान | | शिक्षण | | विधी | | वैद्यक | | आयुवेद | | अभियांत्रिकी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| १ | छ.शि.कला महा.आसेगांव पूर्णा | २०८ | १७३ | २०८ | १७३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

## ४ ) २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रातील एकुण विद्यार्थी,मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे विद्याशाखानिहाय विवरण

| अ क्र | विद्याशाखा | प्रवेशित | | | स्नातक | | | स्नातकोत्तर | | | पदविका प्रमाणपत्र | | | अनुसुचित जाती | | | अनुसुचित जमाती | | | वि.जा.व भ.ज. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| १ | कला | २०८ | १७३ | ३८१ | २०८ | १७३ | ३८१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ७५ | ६९ | १४४ | ११ | ९ | २० | ८ | १६ | २४ |

प्राचार्य
छत्रपति शिवाजी कला महाविद्यालय

५) २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रातील एकुण शिक्षक व मागासवर्गीय शिक्षकांचे जिल्हा व विद्याशाखानिहाय विवरण

| अ. क्र | जिल्हा | विद्याशाखा | एकुण शिक्षकांची संख्या | | | अनुसुचित जाती | | | अनुसुचित जमाती | | | वि जा भ ज | | | इमाव | | | इतर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रि | एकुण | पुरुष | स्त्रि | एकुण | पुरुष | स्त्रि | एकुण | पुरुष | स्त्रि | एकुण | पुरुष | स्त्रि | एकुण | पुरुष | स्त्रि | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| १ | अमरावती | बिए ( कला ) | ६ | १ | ७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | १ | ६ |

## प्रकरण पाचवे

## Development Scheme

**१. Grants Received by University College teachers for research from UGC (during the financial year 2021-2022**

| Sr. No | Name of the College | Number of Teachers | Total Amount ( In Rs. ) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Chatrapati Shivaji Kala M.V. Asegaon Purna.Dist.Amravati | **Nill** | |

टिप. सदर माहीती सांख्यिकीय स्वरुपात द्यावी

**२). Grants Received by College during the financial year 2021-2022 from UGC**

| Sanctioned Schemes & Grants Allotted | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr .No | Name of the College | Building | Books& Journals | Sport Equipments | y Equipments | PTAC | F I P | Others | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | |
| 1 | Chatrapati Shivaji Kala M.V. Asegaon Purna.Dist.Amravati | Nill | Nill | Nill | Nill | Nill | Nill | Nill | Nill | |

प्राचार्य
छत्रपति शिवाजी कला महाविद्यालय
आसेगांव पूर्णा,
ता. चांदर बाजार, जि. अमरावती

प्रकरण आठवे

१. Statemant showing the particuiars of Research papers published by the Teachers of the Affiliated Colleges

| Sr.No. | Name of the College | Subject | Number of Teachers who had published the | Number of papers published |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Chatrapati Shivaji Kala Mahavidyalaya, Asegaon Purna,Dist. Amravati | **Physical Education.** | 1 | 4 |
| | | **Political Sci** | 1 | 1 |
| | | **Economics** | 1 | 2 |

टिप- १ ) १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी
२ ) सदर माहीती सांख्यकीय स्वरुपात द्यावी

३ ) Statemant showing the particulars of research papers presented in the International Conference held at abroad by the Teachers of the Affiliated Colleges / University Teaching Department

| Sr.No | Name of the Teachers & name of the Teaching Deptt/College | Subject | Title of Research paper | Conference Name, Venue,Date |
|---|---|---|---|---|
| १ | २ | 3 | 4 | 5 |
| 1 | Chatrapati Shivaji Kala Mahavidyalaya, Asegaon Purna,Dist. Amravati | Nill | Nill | Nill |

टिप - फक्त विदेशामधील पीरषदांचे वाचण केलेल्या शोध निबंधांचीच माहीती देउन त्याच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात.
२ ) १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी

प्राचार्य
छत्रपति शिवाजी कला महाविद्यालय
आसेगांव पूर्णा,
ता. चांदूर बाजार, जि.अमरावती

**Statement showing the particular of No.of Conference organised by affiliated colleges/ University Teaching Deparrtments**

| Sr.No | College/University Teaching Dept | Tittle of Conference&Date | Level State/National/International | No of participants | | Mode of Conference Offline/Online |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | From India | Out of India | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Chatrapati Shivaji Kala Mahavidyalaya,Asegaon Purna,Dist.Amravati | Two Days International sciectific E-Conference on a physical education,sports sciences,Health,fitness,Physical Activity And sports competitions.Date-20&21 Aug.2021 | International | 915 | 21 | Online |
| 2 | | One day International webinar on Women Empowerment through Games and Sports,Date-31 Jan-2022 | International | 227 | 7 | Online |

टिप - १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी

**५)Statement showing the particular of Patents published/granted to the Teachers/Students of the University Teaching Deparrtments and affiliated colleges.**

| Sr.No | Name of the | Tittle | Patent filed No & Date | Examination & Date | Patent granted No.& Date |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | Mahavidyalaya,Asegaon | **निरंक** | | | |

टिप - १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी

**६)Statement showing the particular ofCopyright granted to the Teachers/Studants of the University Teaching Deparrtments and affiliated colleges.**

| Sr.No | Name of Teacher/Students Name of the College/University Teaching Dept | Title | Copyright granted No.and Date |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |

टिप - १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी

प्राचार्य
छत्रपति शिवाजी कला महाविद्यालय
आसेगांव पूर्णा,
जि. अमरावती

## ६ ) राज्य स्तर / राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त केलेल्या संलग्नित महाविद्यालयान शिक्षक व विद्यार्थ्याची माहीती

| अ.क्र | पुरस्कार विजेत्याचे नाव | राज्यस्तर/ राष्ट्रीय स्तर | पुरस्काराचे नांव व स्वरुप | पुरस्कार प्राप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | Nill | | Nill | |

टिप - पुरस्काररसंबंधीच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडाव्यात

२.) १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी

## ८ ) राष्ट्रीय छात्रसेना ( N C C )

| महाविद्यालयाचे नाव | छात्रसेना विद्यार्थी | | छात्रसेना अधिकारी | | वार्षिक शिबीरात सहभागी . अधिकारी | | | | नवी दिल्ली सहभाग | | | बी प्रमाणपत्र उत्तीर्ण | | सी प्रमाणपत्र उत्तीर्ण | | अंतर्गत सहभाग | | दिल्ली सहभाग | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | पुरुष | स्त्रि | मुले | मुली | पुरुष | स्त्रि | मुले | मुली | अधिकारी | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| छत्रपती शिवाती कला महाविद्यालय, आसेगांव पुर्णा ता. चांदुर बाजार जि. अमरावती. | माहीती निरंक | | | | | | | | | | | | | | | | | | |

सी.अधिका-यांचीच द्यावी.कनिष्ठ महाविद्यालयातील छात्रांची व एन सीसी अधिका-यांची देउ नये.

२) रकाना क्र. ११.१२,व १३ मधील गणतंत्र दिवस दिवस शिबीर,नवी दिल्ली येथे सहभागी वरीष्ठ महाविद्यालयाचे एन सी सी छात्र व अणिकारी यांचीच माहीती द्यावी.

३) युथ एक्सचेंज प्रोग्राम मध्ये व थल सेनिक शिबीर,नवी दिल्ली येथे सहभागी छात्र व अधिकारी यांचे सहभागाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

४.) १ जुलै २०२१ ते ३० जुन २०२२ या कालावधीतीलच माहीती द्यावी

प्राचार्य
छत्रपति शिवाजी कला महाविद्यालय
आसेगांव पूर्णा,
ता. चांदूर बाजार, जि.अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

वीर बाजीप्रभू क्रीडा व व्यायाम मंडळ, बेलोरा व्दारा संचालित

# छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा

## राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल

प्राचार्य

डॉ. हनुमंत रा. लुंगे

( अध्यक्ष, राष्ट्रीय सेवा योजना )

डॉ. आशिष दि. काळे

( कार्यक्रम अधिकारी )

डॉ. सुवर्णा दे. जवजांळ

( महिला कार्यक्रम अधिकारी )

सत्र : **२०२१ - २०२२**

# छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल

## सत्र : **२०२१ - २०२२**

शैक्षणिक सत्र **२०२१ - २०२२** मध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात आले. सध्या जगावर व देशात कोरोनाचे ( कोविड **- १९**) चे त्याचबरोबर महाराष्ट्रात सर्वांत जास्त कोरोना विषाणू ने बाधीत राज्य आहे. शैक्षणिक सत्राची सुरूवात सुध्दा ऑनलाईन (Online) च्या माध्यमातून परंतू राष्ट्रीय सेवा योजना हा एकमेव असा घटक आहे की जो प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कार्य करीत होता. राष्ट्रीय सेवा योजना पथकातील बहु:ताश स्वयंसेवकांनी वर्षभर विविध कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. दिनांक **२४ / ९ / २०२१** रोजी राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली. समाजसेवेचा पिंड असलेले आमचे आदरणीय प्राचार्य डॉ. हनुमंत रा. लुंगे अध्यक्ष तर समाजसेवेची आवड असलेले डॉ. भारत कल्याणकर, समाजातील लहानातील लहान घटनेकडे लक्ष वेधणारे श्री रत्नदिप तंतरपाळे (पत्रकार), प्रा.डॉ.निलेश कडू (जिल्हा समन्वयक), प्रा. डॉ.संजय कोठारी, (क्षेत्रिय समन्वयक), दत्तक ग्राम धानोरा पूर्णा चे सरपंच श्री. निलेश कडू, रासेयो पथकातील विद्यार्थी प्रतिनिधी रोहीत बोबडे व विद्यार्थी प्रतिनिधी कु. पूजा नितनवरे इत्यादी सदस्य तर महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवजांळ सहसचिव तर सचिव म्हणून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे हे आहेत.


सल्लागार समितीच्या निर्णयानुसार राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या स्वयंसेवकांना या वर्षाच्या नोंदणीकरीता अर्जाचे वाटप करण्यात आले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ युनीट नुसार महाविद्यालयाच्या मुले व मुली असे **१००** स्वयंसेवकाची क्षमता असणारे रासेयो चे युनिट आहे. या सत्रा मध्ये मुले व मुली ची नोंदणी झालेली आहे.

सत्र **२०२१ - २०२२** मध्ये रासेयो पथकाच्या वतीने खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

- **जागतिक पर्यावरण दिवस महाविद्यालयात संपन्न**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व भुगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **५/ ६/ २०२१** रोजी आभासी पध्दतीने **जागतिक पर्यावरण दिवस** साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचा विषय **पर्यावरण संवर्धनात आदिवासींची भूमिका** प्रमुख मार्गदर्शक डॉ. नितीन गणोरकर टाटा संशोधन केंद्र मुंबई यांनी याप्रसंगी आदिवासी आणि पर्यावरण यांचे नाते अतुट आहे, आदिवासी पर्यावरणाला देव मानतात तसेच सर्व चराचर सृष्टीत जीवात्मा असते अशी त्यांची श्रध्दा आहे, आदिवासी हे निसर्गाच्या सानिध्यात असते त्यामुळे ते झाडे तोडायला विरोध करतात, दरवर्षी पर्यावरण दिवसाची थीम असते आणि या **वर्षाची थीम** होती **इकोसिस्टिम रिस्टोरेशन.** परिसंस्थेची हानी न होता तिचे संतुलन भरून काढण्याचा प्रयत्न करणे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी या प्रसंगी सांगितले की, जागतिक तापमान कमी करण्यासाठी प्रत्येकाने स्वताः पासुन सुरवात करायला हवी असे सांगत पर्यावरणाचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. मनोज सपकाळ यांनी केले. आभार डॉ. भारत कल्याणकर यांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.





मंगळवार, दि. ८ जून, २०२१

मातृभूमि

आसेगाव पूर्णा येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात

जागतिक पर्यावरण दिवस साजरा

## ➢ शिवराज्याभिषेक दिवस महाविद्यालयात संपन्न

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **६ / ६ / २०२१** रोजी आभासी पध्दतीने शिवराज्याभिषेक साजरा करण्यात आला. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक संतोष झामरे प्रसिध्द शिवव्याख्याते यांनी सांगितले की, मध्ययुगीन कालखंडात शुद्रातीशूद्रांनी राज्यभिषेक करणे, नेतृत्व करणे तसेच शेतकरी, कष्टकरी, श्रमीक, पूर्वाश्रमीच्या अस्पृश जातींना कष्ट करायचे पण प्रतिनिधींचे स्वप्न पाहायचे नाही असा तो काळ होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यभिषेकाचा निर्णय घेतला त्यात पण खूप अडचणी आल्या त्यांच्या मातोश्री जिजाऊ मॉसाहेब त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी याप्रसंगी सांगितले की, शिवाजी महाराजांचा भगवा ध्वज हा प्रगतीचा, त्यागाचा, संघर्षाचा, समतेचा प्रतिक आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. भारत कल्याणकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. प्रविण सदार यांनी केले. आभार डॉ. रविंद्र इचे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. हरिष काळे, प्रा. विपिन लिल्हारे, डॉ. मनोज सपकाळ, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ, डॉ. वनिता चौधरी, सौ. मुक्ता निंभोरकर, श्री. दिनेश वाटाणे, श्री. विष्णू घोम; श्री. सजंय सोळंके, श्री. अविनाश कडू; तसेच राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.









अमरावती मातृभूमि


रविवार, दि. १३ जून २०२१

छ.शिवाजी कला महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिवस साजरा

➢ योग दिवस महाविद्यालयात सपन्न

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२१ / ६ / २०२१** रोजी आभासी पध्दतीने **७** वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक डॉ. रविंद्र सावरकर योगतज्ञ तथा शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख स्व. छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, कॅम्प परतवाडा यांनी सांगितले की, योगीक सुक्ष्म व्यायाम, प्राणयाम व मुद्रांचे महत्व या विषयावर त्यांनी पूढे सांगितले की, योग असे जिथे, आरोग्य वसे तिथे, मनुष्याच्या जीवनामध्ये योग आणि प्राणयामाला खूप महत्व आहे. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी याप्रसंगी सांगितले की, शरीर हीच खरी संपत्ती आहे, योग, प्राणयामामध्ये संपूर्ण आजारांना दूर करण्याची शक्ती आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रास्ताविक डॉ. हरिष काळे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख आसेगांव पूर्णा यांनी केले. आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. भारत कल्याणकर, डॉ. रविंद्र इचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ, डॉ. प्रविण सदार, प्रा. विपिन लिल्हारे, डॉ. मनोज सपकाळ, डॉ. वनिता चौधरी, सौ. मुक्ता निंभोरकर, श्री. दिनेश वाटाणे, श्री. विष्णू घोम, श्री. सजंय सोळंके, श्री. अविनाश कडू तसेच राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.





मातृभूमि

बुधवार, दि. २३ जून २०२१

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय

**आसेगाव पूर्णा येथे योग दिवस साजरा**

**वार्ताहर/२२ जून**

**आसेगाव**-छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय , आसेगाव पूर्णा येथे 7 वा आंतरराष्ट्रीय योग दिवस दिनांक 21 जून 2021 रोजी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आभासी पध्दतीने आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. रवींद्र सावरकर, योगतज्ञ व संचालक शारीरिक शिक्षण विभाग, स्व. सी.एम. कढी महाविद्यालय, अचलपूर हे होते , योगीक सूक्ष्म व्यायाम, प्राणायाम व मुद्रांचे महत्व या विषयावर त्यांनी आपल्या मार्गदर्शन पर व्याख्यानामध्ये योग असे जेथे, आरोग्य वसे तिथे , मनुष्याचा जीवनामध्ये योग आणि प्राणायाम ला खूप महत्व आहे. मनुष्याला आयुष्यात समृद्ध आणि निरोगी राहायचं असेल तर भारतीय संस्कृती मधील योगाभ्यास आणि प्राणायाम या दोन्ही गोष्टी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनीच नियमितपणे केले पाहिजे. भारतातील परंपरेने योगाचे व प्राणायामाचे अनेक विकसित केलेले आहेत, त्याची जाणीव आणि जागृती करणे आजच्या कोविड 19 काळात खूप गरजेचे झाले आहे. कोरोना, शुगर, रक्तदाब इ. रोगावर विजय मिळवायचे असेल तर प्रत्येकानी योग व प्राणायाम करून आपली प्रतिकार शक्ती वाढविली पाहिजे. योग आणि प्राणायामाच्या बाबतीत भारत जगाचे नेतृत्व करीत आहे, याचा आपल्या सर्वांना अभिमान असायला पाहिजे. त्याचप्रमाणे सरांनी प्रात्यक्षिक करून दाखविले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये, शरीर हीच खरी सम्पत्ती आहे, प्राणायाम आणि योगामध्ये सम्पूर्ण आजारांना दूर करण्याची शक्ती आहे. आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये मनुष्याचे जीवनशैली पूर्णपणे बदलली आहे, बहुतेक सर्वच ताणतणावात जगत आहे, हा ताणतणाव कमी करण्याकरिता योगा व प्राणायाम दररोज कमीतकमी एक तास करणे आवश्यक आहे. योगाभ्यास करून सशक्त युवा निर्माण होणे हि काळाची गरज आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.या कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक शारीरिक शिक्षण संचालक, डॉ. हरीश काळे यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आशिष काळे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. भारत कल्याणकर, प्रा. डॉ. प्रवीण सदार, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्येने रा. से. यो. स्वयंसेवक उपस्थित होते.

➢ छत्रपती शाहू महाराज जयंती महाविद्यालयात संपन्न

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना इतिहास विभाग व समाजशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२६ / ६ / २०२१** रोजी आभासी पध्दतीने छत्रपती शाहू महाराज जयंती **सामाजिक न्याय दिन** म्हणून साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. अमोल बंड राज्यशात्र विभाग प्रमुख आदर्श विज्ञान, जय रामदास भागचंद कला व वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे यांनी सांगितले की, शाहू महाराज यांनी आरक्षण धोरण, समताधिष्ठित समाज निर्मितीचे कार्य, आंतरजातीय विवाहाला मान्यता, स्त्री शिक्षणाचा कायदा, देवदासी प्रथा बंदी इ. अत्यंत महत्वपूर्ण विषयावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी या प्रसंगी शाहू महाराज यांच्या कार्यावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. भारत कल्याणकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. प्रविण सदार यांनी केले. आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. हरिष काळे,

डॉ. रविंद्र इचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ, प्रा. विपिण लिल्लारे, डॉ. मनोज सपकाळ, डॉ. वनिता चौधरी, सौ. मुक्ता निंभोरकर, श्री. दिनेश वाटाणे, श्री. विष्णू घोम, श्री. सजंय सोळंके, श्री. अविनाश कडू तसेच राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



आपल्या शहरातील प्रत्येक बातमी साठी स्थान

आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

**परतवाडा टाईम्स**

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

देशमुख प्लॉट, पेन्शनपुरा परतवाडा ता. अचलपूर, जि. अमरावती-444805 | भ्रमणध्वनी-9552970699 paratwadatimes@gmail.com | paratwadatimes YouTube paratwadatimes

दि. 26-06-2021

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालया आसेगाव पूर्णा येथे छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन संपन्न.**

**युवराज डोंगरे | खल्लार**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन संपन्न झाला.

इतिहास विभाग, समाजशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अमोल बंड राज्यशास्त्र विभाग प्रमुख आदर्श विज्ञान जय रामदास भागचंद कला व वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे उपस्थित होते. प्रा. बंड सर यांनी शाहू महाराज यांच्या कार्यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या विवेचनातून छत्रपती शाहू महाराजांचे आरक्षण धोरण, समताधिष्ठित समाज निर्मितीचे कार्य, शैक्षणिक धोरण, आंतरजातीय विवाहाला मान्यता, स्त्री शिक्षणाचा कायदा, देवदासी प्रथा बंदी, इत्यादी अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रवीण सदार यांनी केले. संचालन समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भारत कल्याणकर व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष काळे त्यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण आभासी पद्धतीने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ रवींद्र इचे. डॉ.मनोज सपकाळ, डॉ.हरीश काळे. डॉ. सुवर्णा जवंजाळ, प्रा. बिपिन लिल्हारे, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



➢ राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महाविद्यालयात वृक्ष लागवड करण्यात आले.

वीर बाजीप्रभू क्रीडा व व्यायाम मंडळ, बेलोरा व्दारा संचालित, छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने मा.ना.श्री. बच्चुभाऊ बा. कडू (राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या वाढदिवसानिमित्य दिनांक **५/७/२०२१** रोजी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड करण्यात आले. यामध्ये चिंच, वड, बकुळी, निलगिरी, कडूनिंब, साग, बदाम, कडूबदाम, अशोकनिंब इत्यादी विविध प्रकारची जवळ जवळ 10 वृक्ष लावण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी वृक्षांचे पर्यावरणासाठी असलेले महत्व सांगितले. तसेच श्री. भैयासाहेब बा. कडू, वीर बाजीप्रभू क्रीडा व व्यायाम मंडळ, बेलोरा यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून हया मोहिमेची सुरूवात करण्यात आली. वृक्ष लागवड केल्याने महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर ग्रीन झोन मध्ये रूपांतरीत होत आहे. यापूर्वी सुध्दा दरवर्षी प्रमाणे महाविद्यालयात विविध वृक्षाची लागवड करण्यात आली. त्याचप्रमाणे मा. ना. श्री बच्चुभाऊ बा. कडू (राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या वाढदिवसा निमित्य रासेयो च्या स्वयंसेवकानी त्यांच्या गावात, शेतात एक एक वृक्ष लावले. यावेळी महाविधालयातील डॉ. भारत कल्याणकर, डॉ. हरिष काळे, डॉ. प्रविण सदार, डॉ. रविद्र इचे प्रा. विपिन लिल्हारे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा जवंजाळ श्री. आशिष ढोके (मुख्याध्यापक) सौ. मुक्ता निंभोरकर, श्री. दिनेश वाटाणे, श्री. विष्णू घोम, श्री. सजंय सोळंके, श्री. अविनाश कडू, राहूल खाटकर, नितिन कडू, राकेश कासदेकर, अविनाश मेश्राम, हरिभाऊ बोरवार हे कार्यक्रमाला उपस्थित होते. या सर्वांच्या हस्ते एक एक वृक्ष लावण्यात आले. सोबतच देवानंद, लवकेश, पुजा, प्रज्ञा, काचंन, रोहीत, पल्लवी, वैष्णवी, साक्षी, राधा, मयुरी, पवन, विशाल, गोपाल, रेश्मा, निकिता, दिपक, विजय, आरती, प्रज्वल व इतर रासेयो च्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. सोबतच कोरोना नियमानुसार सॅनिटाईजर, सुरक्षित अंतर व चेह-याला माक्स लावून सर्व कार्य पार पाडण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले.








दैनिक दिव्य मराठी

दिव्य मराठी, सोमवार, १२ जुलै २०२१

वृक्षारोपणप्रसंगी प्राचार्य डॉ. लुंगे, प्राध्यापक, कर्मचारी.

**आसेगाव पूर्णा येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण**

अमरावती । छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे ५ जुलै रोजी राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे शालेय शिक्षण, जलंपदा, कामगार, महिला व बालकल्याण, विमुक्त भटक्या जाती, जमातीचे राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात पर्यावरण पूरक वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पिंपळ, वड, कडूनिंब, बकुळी, सोनचाफा ही मोठ्या प्रमाणात प्राणवायू देणारी झाडे लावण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी सांगितले की, याप्रसंगी वृक्षाचे पर्यावरणासाठी असलेले महत्त्व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातील कथन केले. तसेच राष्ट्रसंत गुरुकुल आश्रम शाळेचे मुख्याध्यापक आशिष ढोके यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष काळे यांनी केले या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

- **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची १०४ वी पुण्यतिथी**


छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिंनाक **१/८ / २०२१** रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची **१०४** वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कल्याणकर यांनी प्रतिमेचे पुजन व हारार्पण केले व विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ, डॉ.प्रविण सदार, डॉ. हरिष काळे, डॉ. रविन्द्र इचे, प्रा. विपीन लिल्हारे श्री. सजंय सोळंके तसेच दिपा, पल्लवी, निकिता, अनुप, कृतिका, काजल, मोहिणी, दिक्षा, पुजा, हर्षाली, तेजस, दिव्या, कल्याणी, रोहीणी, दिपीका, सोनल, शुभम, अनिकेत, रोहीत, योगेश, कपील, मोहम्मद इमरान, मोहम्मद आरिफ, देवानंद, लवकेश, प्रज्वल व विशाल या विद्यार्थ्यानी भाग घेतला.



- **राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त एक दिवसीय वेबिनार**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा व जळगाव शिक्षण मंडळ व्दारा संचालित, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय, जळगाव जामोद येथील शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२९/ ८ / २०२१** मेजर ध्यानचंद सिंग जयंती निमित्य एकदिवसीय वेबिनार चे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले. **वेबिनार** चा **विषय भारतामध्ये खेळांचा विकास** हा होता. सुरवातीला प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम देशमुख उपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. प्रविण डाबरे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. प्रदीप खेडकर व छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे व प्रा. डॉ. गिरीश कुलकर्णी इ. उपस्थित होते. सर्वांनी खेळाचे महत्व विशद करून शारीरिक शिक्षण हा अभ्यासक्रम म्हणून स्वीकारला पाहिजे तर ग्रामीण भागातील विद्यार्थांनी खेळाकडे सर्वांगीन

विकासाच्या दृटिकोनातून बघितले पाहिजे, खेळात सहभाग घेतला पाहिजे. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले, प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. हरिष काळे यांनी केले. आभार डॉ. प्रविण सदार यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमाला डॉ. रविन्द्र इचे, डॉ. भारत कल्याणकर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ डॉ. वनिता चौधरी, प्रा. विपीन लिल्हारे, डॉ. मनोज सपकाळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.








भारतीय सौर १२ भाद्रपद १९४३

## आसेगाव पुर्णा येथे राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त एक दिवसीय वेबिनार



साप्ताहिक


## परतवाडा टाईम्स


संपादक - नरेश तायवाडे मो. 9552970699 paratwadatimes@gmail.com 02-09-2021

### राष्ट्रीय क्रीडा दिवस निमित्त एक दिवसीय वेबिनार चे आयोजन

- महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **०५/०९/२०२१** रोजी आभासी पध्दतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सुरवातीला प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. शांताराम चव्हान, राज्यशात्र विभाग प्रमुख सिपणा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा यांनी असे सांगितले की, समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षक व शिक्षकाची भुमिका महत्वाची आहे. गुरू शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीमधील एक महत्वपूर्ण आणि पवित्र भाग आहे, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. हरिष काळे यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. प्रविण सदार यांनी केले. यांप्रसंगी कार्यक्रमाला डॉ. इचे, डॉ. कल्याणकर, महिला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ डॉ. चौधरी, प्रा. लिल्हारे, डॉ. सपकाळ सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.







साप्ताहिक दर्यापूर दर्पण
EDITION
समाज परिवर्तनासाठी शिक्षण महत्त्वाचे साधन आहे- डॉ. शांताराम चव्हाण
आसेगाव पूर्णा येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा


- **आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन महाविद्यालयात साजरा.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व समाजशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **९ / ९ / २०२१** रोजी आतंरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. साक्षरता दिन या विषयावर गुगल फॉर्मवर प्रश्नावली तयार करून बी. ए. भाग 1, 2,व 3 च्या विद्यार्थांना व राष्ट्रीय सेवा योजने च्या स्वंयसेवकांना प्रश्न सोडविण्याकरिता दिले तसेच विद्यार्थांना साक्षरतेचे महत्व सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. कल्याणकर यांनी केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

- **राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे दिनांक **२४ / ९ / २०२१** रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस आभासी पदधतीने साजरा करण्यात आला. सुरवातीला प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. या **वेबिनार** चा विषय **आजच्या युवकासमोर आव्हाने** हा होता. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. मिलिंद तायडे इतिहास प्रमुख प्रमुख व माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी जगंदबा महाविद्यालय, अचलपूर यांनी याप्रसंगी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे नव चैतन्य, राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ योजना नाही तर ती श्रमाची जोपासणा, राष्ट्रीय सेवा योजनेतूण विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो. महाविद्यालयीन विद्यार्थी समाजातील आव्हाने पेलण्यात सक्षम होतो. **माइयासाठी नव्हे तर तुमच्यासाठी** या बोधवाक्यातुन दुस-या व्यक्तिचा दृष्टीकोण लक्षात घेतला पाहिजे हे सुचित होते. देशाला महासत्ता बनविण्याची खरी ताकद तरूणामध्ये आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी सुवर्णा दे. जवंजाळ यांनी केले, प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. कल्याणकर यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमाला डॉ. हरिष काळे, डॉ. इचे, डॉ. चौधरी, प्रा. लिल्लारे, डॉ. सपकाळ, डॉ. सदार, मुक्ता निंभोरकर, दिनेश वाटाने, विष्णू घोम, संजय सोळंके, अविनाश कडू, विद्यार्थी प्रतिनीधी रोहित बोबडे, विद्यार्थी प्रतिनिधी कु. पूजा नितनवरे या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.









दर्यापूर दर्पण

भारताला महासत्ता बनविण्यासाठी तरुणांचा सहभाग सर्वात महत्त्वाचा- डॉ.मिलिंद तायडे

## ➢ ७५ वा भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाविद्यालयात संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **३० / ९ / २०२१** रोजी **७५** वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्य एक दिवसीय आभासी पद्धतीने वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. **वेबिनार** चा विषय **भारताच्या स्वातंत्र संग्रामात संविधान निर्मिती** हा होता. सुरवातीला प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रशांत खेडकर, राज्यशात्र विभाग प्रमुख, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर यांनी सांगितले की, भारत सरकारने या कार्यक्रमाचे आयोजन केले. वास्को द गामा पासुन ते इंग्रज कशा प्रकारे भारतात आले कश्या करीता आले, यावर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच स्वातंत्र्याचा पहिला उठाव **१८५७** साली झाला व इंग्रजांना विरोध करण्यात आला, अनेक वीरांनी या उठावात भाग घेतला व इतिहासात या उठावाला सर्वांत महत्व आहे. वर्तमान काळात देशातंर्गत व जगात लोकशाही विरोधी कारवाई सुरूच आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रविण सदार यांनी केले, प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. रविन्द्र इचे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डॉ. हरिष काळे, प्रा. विपीन लिल्हारे व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.




दर्यापूर दर्पण

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपन्न

## ➢ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात स्वच्छता पंधरवाडा संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **७** सप्टेंबर **२०२१** रोजी स्वच्छता पंधरवाडा आयोजित करण्यात आला, या पंधरवाडया मध्ये महाविद्यालय

परिसरातील स्वच्छता मोहिमेस सुरवात करण्यात आली. महाविद्यालयाचे, प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये स्वच्छता अभियान, जनजागृती करण्यात आली, तसेच निंबध स्पर्धा, साक्षरता दिन या निमित्य गुगल फ्रॉम वर प्रश्नावली विदयार्थ्यांकडून भरून घेण्यात आली. असे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले. स्वच्छता पंधरवाडा यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.








जनसामान्यांचा बुलंद आवाज

दर्यापूर दर्पण

ई-दैनिक

वाचकांच्या पसंतीचे नं.१ चे ई-दैनिक

दि. १९ सप्टेंबर २०२१

9096945629,9822876737

मुख्य संपादक – अमोल कंटाळे

Social Media Edition

■ मुख्य कार्यालय – सिव्हील लाईन, नविन तहसिल जवळ, दर्यापूर ■ संपादक – निलेश पारडे daryapur.d2019@gmail.com

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयातील**

**'रासेयो'च्या वतीने स्वच्छता पंधरवाडा**

आसेगाव पूर्णा(प्रतिनिधी)– येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय येथे दि.७ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजने च्या वतीने स्वचछता पंधरवाडा आयोजित करण्यात आला होता, या पंधरवाड्या मध्ये महाविद्यालय परिसरातील स्वच्छता मोहीमेस सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे व डॉ. आशिष काळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या पंधरवाड्यात स्वचछता जनजागृती करण्यात आली तसेच निबंध स्पर्धा, साक्षरता दिन या निमित्त गूगल फ्रॉम वर प्रश्नावली विध्यार्थी कडून भरून घेण्यात आली. असे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार आहे.


स्वच्छता पंढरवाडा यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विध्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती महाविद्यालयात संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२ / १० / २०२१** रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची **१५२** वी जयंती व लालबहादुर शास्त्री यांची जयंती आभासी पद्धतीने साजरी करण्यात आली, सुरवातीला प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली, या **वेबिनारचा** विषय **गांधी विचारांची प्रासंगिकता** हा होता. प्रमुख मार्गदर्शक डॉ. योगेश वडतकर राज्यशात्र विभाग प्रमुख सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडा यांनी आपल्या मार्गदर्शनात माझ जीवन हाच माझा संदेश आहे. गांधी शरीराने संपले तरी त्यांचे विचार वर्तमान काळात जिंवत ठेवतात. जगातला असा एकही व्यक्ती नसेल की, ज्याच्या जिवनाला गांधीवादाने कधीच स्पर्श केला नसेल. महात्मा गांधीनी आपल्या विचारातून आणि कृतीतून आयुष्यभर सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह यांचा संदेश दिला. त्याचप्रमाणे खेडे स्वयंपूर्ण झाले तर देश


स्वयंपुर्ण होईल. **खेडयाकडे परत चला** असा नारा गांधीनी दिला. आज **२१** व्या शतकात खरा ठरत आहे. बुनियादी शिक्षण व्यवस्था त्यांनीच सांगितली म्हणून स्वांतत्रेत्तर व स्वातंत्र मिळाल्या नंतर गांधी विचारांची प्रासंगिकता दिसून येते. या वेबिनारचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी सांगितले की, भारताचे दुसरे प्रधानमंत्री भारतरत्न लालबहादुर शास्त्री यांनी **जय जवान जय किसान** चा नारा दिला त्या नाऱ्याची आज गरज असून तोच नारा देशाला बलशाली बनवेल. देशातल्या शेतकरी व सामान्य माणसाचे दु:ख जाणणारे प्रधानमंत्री होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. हरिष काळे यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार प्रा. विपीन लिल्हारे यांनी केले. हा वेबिनार यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




- **माहिती अधिकार सप्ताह महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **११** ऑक्टोबर **२०२१** रोजी आभासी पध्दतीने **माहिती अधिकार सप्ताह** साजरा करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनिल कडू राज्यशात्र विभाग प्रमुख स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, वरूड हे होते. या प्रसंगी त्यांनी असे सांगितले की, माहिती अधिकार हा लोकशाहीचा प्राणवायू आहे. ज्यावर लोकशाही जीवंत राहू शकते, माहिती अधिकार हा सर्वसामान्य माणसासाठी सर्वात महत्वाचा आहे. तसेच सुरवातीला माहितीचा अधिकार कोणत्या देशात लागू करण्याकरिता आंदोलन करण्यात आले तसेच जनजागृती करण्यात आली, तसेच अर्ज कसा करावा, कुठे करावा, फी कीती भरावी लागते, माहिती किती दिवसात उपलब्ध करून दिल्या जाते, यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी माहितीचा अधिकार यावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. भारत कल्याणकर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. रविन्द्र इचे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.





छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,
आसेगाव पूर्णा येथे माहिती अधिकार सप्ताह संपन्न

छता अभियानांतर्गत धडक कार्यक्रम

➢ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी महाविद्यालयात संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **२५ / १० / २०२१** रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची **५३** वी पुण्यतिथी संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी प्रतिमेचे पुजन व हारार्पण करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. प्रमुख वक्ते डॉ. भारत कल्याणकर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन कार्य यावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. प्रविण सदार यांनी केले, हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.





daryapur.d2019@gmail.com 9096645629, 9822876737

जनसामान्याचा बुलंद आवाज

दर्यापूर दर्पण

वाचकांच्या पसंतीचे नं 1 चे ई-दैनिक मुख्य संपादक - अमोल कंटाळे

मुख्य कार्यालय - नविन तहसिल जवळ, सिव्हील लाईन, दर्यापूर दि. ३० ऑक्टोबर २०२१

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५३ वी पुण्यतिथी संपन्न

आसेगाव पूर्णा(प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,आसेगाव पूर्णा येथे दि.२५ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५३ पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी सुरुवातीला वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हरार्पन करून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला व ग्रामीण भागातील उन्नती ग्रामगीता महत्वाची आहे असे सखोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.भारत कल्याणकर यांनी सांगितले की, मनुष्याने चांगले जीवन कसे जगता येईल व आपलं गाव व देश कशे आदर्श बनेल गावाचा विकास व देशाचा विकास कसा होईल हे ग्रामतीतेत सांगितले आहे व त्या नुसार आपले जीवन जगावे वेळ पडली त देशाचे स्वरक्षण करण्यासाठी तरुणांना एकत्र येऊन देशाचे स्वरक्षण करण्यासाठी जीवाची पर्वा करू नये असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. विपीन लिल्लरे यांनी ग्रामगीतेवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रविंद्र इचे यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आशिष दि. काळे ( राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी ) यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.प्रवीण सदार यांनी केले.पुण्यतिथी चा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री.दिनेश वाटणे, निभोरकर मॅडम श्री.विष्णू घोम, श्री.संजय सोळंके,श्री.अविनाश कडू विध्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

➢ कोविड १९ लसीकरण शिबिर महाविद्यालयात संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग तसेच य.च.म.मु. विद्यापीठ नासिक अभ्यासकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने **२३** ऑक्टोंबर **२०२१** पासुन युवा स्वास्थ मिशन अंतर्गत महाविद्यालयात दिनांक **२७ / १० / २०२१** ला कोविड **१९** महाविद्यालयातील विद्यार्थांकरिता व परिसरातील विद्यार्थांकरिता कोविड लसीकरण शिबिर राबविण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्रचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी प्रतिमेचे पुजन करून व विद्यार्थ्यांना आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे लसीकरण वेगाने होण्यासाठी लसीकरणाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. हरिष काळे यांनी केले. श्री. सुनिल दिवान आरोग्य सेवक प्राथमिक

आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा, श्री. नितिन कनविर आरोग्य सेवक प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा, श्रीमती वर्षाताई सोनोने आरोग्य सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.








जनसामान्यांचा बुलंद आवाज
दर्यापूर दर्पण
ई-दैनिक
वाचकांच्या पसंतीचे नं.१ चे ई-दैनिक
दि. १९ सप्टेंबर २०२१
9096945629,9822876737
मुख्य संपादक - अमोल कंटाळे
Social Media Edition
मुख्य कार्यालय - सिव्हील लाईन, नविन तहसिल जवळ, दर्यापूर
संपादक - निलेश पारडे
daryapur.d2019@gmail.com

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयातील 'रासेयो' स्वयंसेवकांनी लसीकरनात स्वयंपूर्ण सहभाग**

आसेगाव पूर्णा(प्रतिनिधी)- येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागव्दारे आयोजित ग्रामपंचायत आसेगाव पूर्णा व ग्रामपंचायत टाकरखेड पूर्णा प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगाव पूर्णा येथे सुरू असलेल्या करोना लसीकरण कार्यक्रमात सहभाग घेतला. करोना या विषाणूच्या लसीकरनात शासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन करणे तसेच वेळोवेळी लसीकरण मोहीम राबविणे आवश्यक आहे तसेच लसीकरणाचे महत्व पटवून देण्यात आले. तसेच लसीकरणासाठी नोंदणी करणे, ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, तोंडाला मास्क लावणे लोकांची गर्दी कमी करणे लोकांची लाईन वेवस्थित लसीकरणासाठी लावणे तसेच लसीचा पहिला व दुसरा दोस घेतला त प्रमाणपत्र खूप कामाचे आहे इ. लसीकरणाचे महत्व पटवून देण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व नागरिकांनी लसीकरणासाठी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. आशिष काळे ( राष्ट्रीय सेवा योजना) कार्यक्रम अधिकारी यांनी घडवून आणला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विध्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


जनसामान्यांचा बुलंद आवाज
दर्यापूर दर्पण
ई-दैनिक
वाचकांच्या पसंतीचे नं.१ चे ई-दैनिक
दि. २९ ऑक्टोबर २०२१
9096945629,9822876737
मुख्य संपादक - अमोल कंटाळे
Social Media Edition
मुख्य कार्यालय - सिव्हील लाईन, नविन तहसिल जवळ, दर्यापूर
संपादक - निलेश पारडे
daryapur.d2019@gmail.com

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय येथे कोविड लसीकरण शिबीर संपन्न**

अचलपूर(प्रतिनिधी)- आसेगाव पूर्णा येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय येथे दि.२७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना,शारीरिक शिक्षण विभाग,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अभ्यास केंद्र (१२१२२) आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगाव पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३/१०/२०२१ पासून मिशन युवा स्वास्थ अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थीसाठी कोविड १९ लसीकरण शिबिर राबविण्यात आले.

सद्य:करोना संक्रमनाचे प्रमाण कमी होत असले तरी धोका मात्र कमी झालेला नाही, त्यातच महाराष्ट्र सरकारद्वारे गेल्या २०/१०/२०२१ पासून महाविद्यालये सुरू करण्यात आलेले आहे.महाविद्यालयातील १८ वर्षा वरील विद्यार्थीचे मिशन युवा स्वास्थ अंतर्गत लसीकरण शिबिर आयोजित करण्याचे आदेश प्राप्त झाले, त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयामध्ये कोविड १९ लसीकरण शिबिर राबविण्यात आले आहे. या मोहिमेला विद्यार्थीनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

कोविड १९ लसीकरण शिबिराला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर, श्री. सुनिल दिवाण आरोग्य सहाय्यक, श्री. नितीन कानविर आरोग्य सेवक श्रीमती. वर्षाताई सोनोने आरोग्य सेविका डॉ. आशिष दि. काळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) डॉ. हरिष काळे, डॉ. रवींद्र इचे डॉ. प्रवीण सदार प्रा. विपीन लिल्हारे श्री. दिनेश वाटाणे, मुक्त निभोरक श्री.विष्णू घोम, श्री. संजय सोळंके, श्री. अविनाश कडू सचिन दामोदरे देवानंद, लावकेश, प्रज्वल रितेश, अभिषेक, दीक्षा, पूजा, कृतिका, उमाळे, विशाल ननावरे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठया संख्येने लसीकरणासाठी उपस्थित होत.

➢ राष्ट्रीय एकात्मता दिन महाविद्यालयात संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **३१ / १० / २०२१** रोजी **लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची १४५** वी जयंती व **भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी यांचा स्मृती दिन** साजरा करण्यात आला. सुरवातीला प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले व कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रमुख वक्ते प्रा. विपिन लिल्हारे यांना दोन्ही महापुरूषांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रविन्द्र इचे यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. हरिष काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस**

खल्लार (वार्ताहर): संत गाडगेबाबा अमरावतीत विद्यापीठ अमरावती. वीर बाजीप्रभू क्रीडा व व्यायाम मंडळ बेलोरा, द्वारा संचालित, छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,आसेगाव पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

सुरुवातीला राष्ट्रीय एकतेची शपथ राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाना व प्राध्यापकांना देण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र इचे होते. संचालन प्रज्वल बोबडे यांनी प्रास्ताविक डॉ. आशिष काळे यांनी केले, आभार प्रदर्शन विशाल जामनेकर यांनी केले.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी हरिभाऊ सचिन लवकेश राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आदींनी परिश्रम घेतले.

* **संविधान दिन व नविन मतदार नोंदणी जनजागृती अभियान महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२६ / ११ / २०२१** रोजी **संविधान दिन व नविन मतदार नोंदणी जनजागृती अभियान** आभासी पध्दतीने घेण्यात आला. सुरवातीला प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. तसेच **२६ / ११** च्या दहशदवादी हल्याला **१३** वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्य शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्याच प्रमाणे उद्देशपत्रिकेचे वाचण सामूहिकरित्या करण्यात आले. प्रमुख वक्ते डॉ. संदीप बी. काळे राज्यशात्र विभाग प्रमुख यशंवत महाविद्यालय सेलू जि.वर्धा यांनी संविधान दिन व नविन मतदार नोंदणी जनजागृती अभियान **२०२१** यांचा सुवर्ण योग साधून भारतीय लोकशाही ही जगामधील देशातील सर्वात मोठी असुन मतदानाची टक्केवारी खूप कमी आहे, तसेच मोठया संख्येने मतदान करण्यात यावे आपल्या मताचे महत्व लक्षात यावे या दृष्टीने जनजागृती करूण **१८** वर्ष पूर्ण झालेल्या महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांना मतदान नोंदणी करण्यासाठी प्रेरीत करावे व त्यांनी आपल्या गावामध्ये जे **१८** वर्ष पूर्ण झाले अशा तरूणांना सुध्दा नाव नोंदणी करण्यासाठी प्रेरित करावे. आज देशात संविधान दिन साजरा करत असतांना खऱ्या अथाने लोकशाही मूल्याची देशात स्थापना झाली का? याचा आज विचार करावा लागेल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. भारज कल्याणकर यांनी भारतीय संविधान व गतकाळातील परिस्थिती आजच्या काळातील संविधानाचे महत्व विषद केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आभार डॉ. प्रविण सदार यांनी केले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.












जनसामान्यांचा बुलंद आवाज

दर्यापूर दर्पण

मुख्य संपादक - अमोल कंटाळे

दि.२९ नोव्हेंबर २०२१

9096945629/9822876737

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात संविधान दिन संपन्न**



विदर्भ केसरी

सोमवार, दि. २९ नोव्हेंबर २०२१ ५

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात संविधान दिन

- **महापरिनिर्वाण दिन महाविद्यालयात सपन्न**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व समाजशात्र विभाग तसेच ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **६ / १२ / २०२१** रोजी **६५** वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. सुरवातीला प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. अरूण चव्हान, व्यवस्थापन परीषद सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे उपस्थित होते, त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती वाढविली पाहिजे, दिवाळीत फटाक्यावर खर्च न करता दिवाळी अंक वाचून दिवाळीची बौध्दीक मेजवाणी बौध्दीक क्षमता वाढवावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथाचे वाचन करावे. प्रमुख अतिथी डॉ. सुभाष पवार समाजशात्र विभाग प्रमुख स्व.दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगाव पेठ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे पाहूणे डॉ. श्याम येवतीकर समाजशात्र विभाग प्रमुख गो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूर बाजार यांनी भारतीय संविधानावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचे महत्व पटवून देउन अशा उपक्रमात विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. कल्याणकर यांनी केले. आभार प्रा.लिल्हारे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.






छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय
आसेगाव पूर्णा येथे ६५ वा महापरिनिर्वाण दिन संपन्न

- **संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२० / १२ / २०२१** रोजी संत गाडगेबाबा यांची **६५** वी पुण्यतिथि स्वच्छता अभियान राबवून करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. विपिन लिल्हारे यांनी सांगितले की, मानव समुहाला अज्ञान, अंधश्रध्दा, अनिष्ठ चालीरिती यांच्या जोखाडातून मुक्त करण्यासाठी कीर्तनाची शाळा व संतवचनाचा फळा गाडगेबाबांनी वापरला. त्यातुन शिक्षणाचे नवे आंदोलन उभे केले, याला विज्ञानाची जोड होती. बाबांना शिक्षणाची किती तळमळ होती ते आपल्या कीर्तनातून सर्व सामान्य माणसाला समजावून सांगत असे. प्रमुख अतिथी डॉ. भारत कल्याणकर यांनी याप्रसंगी सांगितले की, बहुजन समाजाला झोपेतून जागे करण्यासाठी प्रबोधनाचे हत्यार बाबांनी उपसले. आज शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला तरी बाबांना अभिप्रेत असणारा समाज निर्माण झाला नाही. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी

याप्रसंगी गाडगेबाबा यांच्या विचारावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. सदार यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.







जनसामान्यांचा बुलंद आवाज

दर्यापूर दर्पण

वाचकांच्या पसंतीचे नं 1 चे ई-दैनिक | मुख्य संपादक - अमोल कंटाळे

दि. २२ डिसेंबर २०२१

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय येथे संत गाडगे बाबा यांची ६५ वी पुण्यतिथी साजरी

आसेगाव पूर्णा (प्रतिनिधी) -

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे दिनांक २०/ १२/ २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा यांची ६५ वी पुण्यतिथी स्वच्छता अभियान म्हणून राबविण्यात आली. सुरुवातीला महाविद्यालयातील परिसर व महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

- ➢ **डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **२७ / १२ / २०२१** रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांची **१२३** वी जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. शेटे मॅडम यांनी सांगितले की, विज्ञानवादी विचारवंत, शिक्षण महर्षी आणि भारताचे पहिले कृषीमंत्री, सामाजिक परिवर्तन सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात धोरणात्मक कार्य केले. शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. श्रध्दांनद वसतीगृहाची स्थापना केली, ते हाडाचे शिक्षक होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्रात आधुनिकीकरण करण्यासाठी त्यांनी कृषीशात्र परिषदेची स्थापना केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भारत कल्याणकर यांनी असे सांगितले की, डॉ. पंजाबराव देशमुख हे प्रागतिक विचारवंत होते, अस्पृशता, वर्णव्यवस्था त्यांना मान्य नव्हती. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार विवेक धाकडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.







आमच्या सोबत...आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

संपादक:-नरेश तायवाडे

दि. 31-12-2021

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांची 123 वी जयंती साजरी

- ➢ **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **३ / १ / २०२२** रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची **१७८** वी जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. शेटे मॅडम यांनी सांगितले की, सरस्वती एक महिला म्हणून तिच्याबद्दल नितांत आदर आहे, सार्वजनिक आणि मोफत शिक्षणाचा पाया आपल्या देशात प्रथमतः फुले दाम्पत्याने घातला. त्यांनी सर्व जातीधर्मातील मुलामुलींना मोफत शिक्षण दिले. त्यांनी ब्राम्हण मुलींना देखील शिकविले. प्रमुख अतिथी प्रा. विपिन लिल्हारे यांनी याप्रसंगी सांगितले की,जोतिराव फुले यांनी तत्कालीन अनिष्ट प्रथा नाकारून सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले,

प्लेगची साथ सुरू असतांना त्यांनी जनतेची सेवा केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भारत कल्याणकर यांनी असे सांगितले की, शाळेच्या पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले आहे. त्यांच्या खांद्याला खांदा लावून फतिमा शेख यांनी अध्यापनाचे काम केले, या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार कु. सिध्दी सोळंके हिने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.






आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

देशमुख प्लॉट,पेन्शनपुरा परतवाडा ता.अचलपूर,जि.अमरावती-444805 | भ्रमणध्वनी-9552970699 paratwadatimes@gmail.com | paratwadatimes YouTube paratwadatimes

दि. 04-01-2022

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी**

रत्नदिप तंतरपाळे | कृष्णापुर

चांदूर बाजार तालुक्यातील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे दि ३/१/२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्य महाविद्यालयात वृक्षारोपण करून जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीला प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. शेटे मॅडम यांनी या प्रसंगी सांगितले की, सरस्वती एक महिला म्हणून तिच्याबद्दल नितांत आदर आहे, परंतु सार्वजनिक आणि मोफत शिक्षणाचा पाया आपल्या देशात प्रथमतः फुले दाम्पत्याने घातला. त्यांनी सर्व जातीधर्मातील मुलामुलींना मोफत शिक्षण दिले त्यांनी ब्राम्हण मुलींना देखील आनंदाने शिकविले. सावित्रीबाई फुले यांच्या काळात जर सरस्वती जन्मला आली असती तर सावित्रीबाईंनी सरस्वतीला शिकवले असते,इतक्या त्या मोठ्या मनाच्या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. विपीन लिल्लारे यांनी या प्रसंगी सांगितले की, जोतिराव फुले यांनी तत्कालीन अनिष्ट प्रथा नाकारून सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले फुलेंनी परिवर्तनाची सुरुवात स्वतःच्या कुटुंबा पासून सुरू केली. या कार्याला जोतीरावांच्या वडिलांचा विरोध होता जोतीराव यांनी घर सोडले पण शिक्षण सोडले नाही.प्लेग ची साथ सुरू असताना त्यांनी सुद्धा जनतेची सेवा केली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भारत कल्याणकर यांनी सांगितले की, फुलेंनी पहिली शाळा १ जानेवारी १८४८ रोजी सुरू केली, ही देशातील पहिली सार्वजनिक आणि मोफत शाळा आहे,त्या शाळेच्या पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले आहेत. त्याच्या खांद्याला खांदा लावून फातिमा शेख यांनी अध्यपणाचे काम केले, त्या केवळ पारंपरिक शिक्षिका नोव्हत्या तर त्या गुलामगिरी, अनिष्ट प्रथा, सनातनी गुंड, विषमता यांच्या विरोधात लढणाऱ्या लेखिका, कवियत्री आणि प्रबोधनकार होत्या.या कार्यक्रमाचे आयोजन सूत्रसंचालन व प्रस्ताविक डॉ. आशिष काळे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. सिद्धी सोळंके नी केले .या कार्यक्रमाला डॉ.हरिष काळे संजय सोळंके ,अविनाश कडू विध्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

➢ **१५ ते १८ या वयोगटातील विद्यार्थांकरिता कोविड लसीकरण शिबिर महाविद्यालयात सपन्न**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग तसेच य.च.म.मु.विद्यापीठ नासिक अभ्यासकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **७ / १ / २०२२** रोजी युवा स्वास्थ मिशन अंतर्गत **१५** ते **१८** या वयोगटातील महाविद्यालयातील विद्यार्थांकरिता व परिसरातील विद्यार्थ्यांकरिता कोविड लसीकरण शिबिर राबविण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी प्रतिमेचे पुजन करून अनाथाची माय आदरणीय पद्श्री सिधूंताई सपकाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. व विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोरोनाचा नविन व्हेरियन्ट ओमायक्रॅान हा जगामध्ये, देशात वेगाने पसरत असुन दिवसेंदिवस कोरोनाबाधित रूग्णांची संख्या वाढत आहे, त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयामध्ये **१५** ते **१८** वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण वेगाने होण्यासाठी लसीकरणाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. हरिष काळे यांनी केले. श्री. सुनिल दिवान आरोग्य सेवक प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा, श्री. नितिन गनविर आरोग्य सेवक प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा, श्रीमती वर्षाताई सोनोने आरोग्य सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगांव पूर्णा, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.






आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

देशमुख प्लॉट,पेन्शनपुरा परतवाडा ता.अचलपूर,जि.अमरावती-444805 | भ्रमणध्वनी-9552970699 paratwadatimes@gmail.com | paratwadatimes YouTube paratwadatimes

दि. 10-01-2022

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,आसेगाव पूर्णा येथे १५ ते १८ या वयोगटातील विध्यार्थ्यांचे लसीकरण संपन्न**

रत्नदिप तंतरपाळे | कृष्णापुर

चांदूर बाजार तालुक्यातील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजना व शारिरीक शिक्षण विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र आसेगाव पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमान युवा स्वास्थ मिशन अंतर्गत १५ ते १८ या वयोगटातील महाविद्यालयातील विध्यार्थ्यां करिता परिसरातील विध्यार्थ्यां करिता कोविडं लसीकरण शिबिर राबविण्यात आले. कोरोनाचा नवीन व्हेरियन्त ओमायक्रोन हा जगामध्ये व देशात वेगाने पसरत असून दिवसेंदिवस कोरोनाबाधित रुग्णाच्या संख्येत वाढ होत आहे त्याचाच ऐक भाग म्हणून महाविद्यालयामध्ये १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण वेगाने होण्यासाठी लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते.


या मोहिमेला महाविद्यालयातील विद्यार्थी नचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

तसेच अनाथांची माय आदरणीय पदमश्री सिंधुताई सपकाळ याना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर, डॉ. आशिष काळे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा जवंजाळ महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. हरिष काळे, डॉ. रविंद्र इचे, डॉ. प्रवीण सदार, प्रा. शेटे मॅडम डॉ. तायडे डॉ. मोनज सपकाळ संजय सोळंके, अविनाश कडू, दिनेश वाटणे ,विष्णू घोम, सचिन, रोहित, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

➢ **राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **१२ / १ / २०२२** रोजी आभासी पध्दतीने राजमाता जिजाऊ

यांची **४२४** वी जयंती व स्वामी विवेकानंद यांची **१५९** वी जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. स्वामी विवेकानंद यांची जयंती **युवक दिन** म्हणून साजरी करण्यात येते, युवक दिनाचा विषय **'आजचा युवक कसा असावा'** हा होता. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. हरिष काळे हे उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, भारतातील युग पुरूषामध्ये गणले जाणारे स्वामी विवेकानंद हे तरूण पिढीसाठी एक आदर्श मानले जातात, एक दैदिप्यमान रत्न धर्म प्रवर्तक चितंक वेदांत मार्ग राष्ट्रसंत तसेच त्यांनी वेदांताच्या वैश्विक वाणीचा प्रचार केला. जर एखादया व्यक्तीला आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी काम करायचे असेल तर त्याला त्यागासाठी तयार राहावे लागेल. राजमाता जिजाऊ यांनी भावना आणि नात्याला बाजूला ठेवून कर्तव्याला महत्व दिले, जिजाबाई शिवाजी महारांजाच्या आद्यगुरू होत्या, असे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी प्रा. अतुल चऱ्हाटे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी असे सांगितले की, स्वामीजींचे शिक्षणाचे तत्वज्ञान नेमके काय होते, त्याच बरोबर शिक्षणाचा मुख्य उदेश माणूस निर्माण करणारे शिक्षण असावे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार डॉ. सदार यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !
परतवाडा टाईम्स
SOCIAL MEDIA EDITION
संपादक:-नरेश तायवाडे
paratwadatimes@gmail.com
दि. 13-01-2022

राजमाता जिजाऊ यांची ४२४ वी, स्वामी विवेकानंद यांची १५९ वी जयंती ऑनलाइन साजरी

- **नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती पराक्रम दिवस म्हणून महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२३ / १ / २०२२** रोजी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण परिपत्रकानुसार **मराठी भाषा पंधरवाडा** तसेच नेताजी सुभाष चंद्र बोस यांचा **पराक्रम दिवस** व **१२५** जयंती निमित्य मराठी भाषा बोली आभासी पध्दतीने संपन्न झाला. प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. काशीनाथ बऱ्हाटे, कोरकू बोली व लोकसाहीत्याचे गाढे अभ्यासक प्राचार्य स्व. छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालय, कॅम्प परतवाडा यांनी भाषेचे महत्व व कोरकू भाषा यावर संपूर्णपणे प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन प्रा.शेटे मॅडम यांनी केले. प्रास्ताविक प्रा.अतुल चऱ्हाटे यांनी केले. आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता प्रा.विशाल तायडे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.


छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा,
मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचलनालय, उच्च शिक्षण यांच्या परिपत्रकानुसार 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस तसेच जयंती निमित्त **"मराठी भाषा व बोली"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन दिनांक २३ जानेवारी २०२२ रोजी दुपारी ठीक ०१.०० वाजता झूम ऑनलाईन प्लॅटफ्रॉम वर आयोजित करण्यात आलेले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष - **प्रा. डॉ. भारत कल्याणकर**, प्र. प्राचार्य, छत्रपती शिवाजी कला महा. आसेगाव पूर्णा

मार्गदर्शक/वक्ते — **प्रा. डॉ. काशीनाथ बऱ्हाटे सर**, कोरकू बोली व लोकसाहित्याचे अभ्यासक, प्राचार्य, स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, परतवाडा.

**Join Zoom Meeting**
https://us04web.zoom.us/j/73729672069?pwd=X8gfMVTsNg9Pig557Y8owG3MwLgjeG.1


**Meeting ID:** 737 2967 2069
**Passcode:** Cskm1234

आयोजक

| प्रा. मेघा शेटे | प्रा. डॉ. आशिष काळे | प्रा. अतुल चऱ्हाटे, |
|---|---|---|
| मराठी विभाग, छत्रपती शिवाजी कला महा. आसेगाव पूर्णा | कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना छत्रपती शिवाजी कला महा. आसेगाव पूर्णा | मराठी विभाग, छत्रपती शिवाजी कला महा. आसेगाव पूर्णा |

- ➢ **जागतिक मतदार दिवस महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **२५ / १ / २०२१** रोजी आभासी पध्दतीने जागतिक मतदार दिन व सामाजिकशात्र अभ्यास मंडळाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरवातीला 'आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेऊन अशी शपथ घेतली, प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रतिभा टावरी मॅडम राज्यशात्र विभाग प्रमुख जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव यांनी असे सांगितले की, या वर्षीची थीम आहे, **बळकट लोकशाहीसाठी मतदान जनजागृती करणे गरजेचे आहे** तसेच जागतिक मतदार दिवस **२०११** ला साजरा करण्याचे आदेश शासनाने दिले तेव्हा पासुन आपण मतदार दिन साजरा करीत आहे. नुसता मतदार दिन साजरा करून चालणार नाही तर मतदानाची टक्केवारी कशी वाढेल याकरिता जनजागृती करून, मतदान करणे हक्काचे नसुन आपले कर्तव्य आहे. ही जबाबदारी तरूणांची आहे. तसेच सामाजिकशात्र अभ्यास मंडळाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी सांगितले की, साक्षरतेचे प्रमाण अधिक वाढले पण मतदानाची टक्केवारी वाढली नाही. संविधानाने मतदान करण्याचा पवित्र अधिकार आपल्याला दिला आहे म्हणून मतदान करणे आपले कर्तव्य आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.









परतवाडा टाईम्स
संपादक:- नरेश तायवाडे
दि. 27-01-2022
छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे
राष्ट्रीय मतदार दिन व सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन सोहळा संपन्न

- ➢ **जागतिक महिला दिवस महाविद्यालयात सपन्न**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व गृहअर्थशात्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **८ / ३ / २०२१** रोजी आभासी पध्दतीने जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक श्रीमती मंजुशा दुराणी, टोमोय शाळा अमरावती हे उपस्थित होते, त्यांनी असे सांगितले की, **२१** व्या शतकातील स्त्री स्वावलंबी आहे, स्त्रियांनी स्वःता तयार होणे गरजेचे आहे, स्त्रियावर अत्याचार होते तेव्हा समाज अजुनही पुढे येऊन प्रतिकार करत नाही हे दुर्देव आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. वनिता चौधरी यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ यांनी केले. आभार प्रा. शेटे मॅडम यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




कोरोना संकटात स्त्रियांनी भरीव योगदान दिले
मंजुषा दुराणी यांचे प्रतिपादन
आसेगाव पूर्णा येथे महिला दिन





सर्व सामान्यांचा बुलंद आवाज
ब्राम्हणवाडा थडी दर्पण
संपादक - इंजि.धिरज बाळासाहेब सोनार
दि.१०/०३/२०२२

**कोरोनामुळे आलेल्या संकटात स्त्रियांनी भरीव योगदान दिले सौ. मंजुषा दुराणी**

कृष्णापुर(रत्नदिप तंतरपाळे)

➢ जागतिक आरोग्य दिवस महाविद्यालयात संपन्न.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक **७ / ४ / २०२२** रोजी जागतिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आला. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक श्रीमती डॉ. रश्मी चौव्हान यांनी सांगिजले की, आजच्या धावपळीच्या आयुष्यामध्ये स्वतःकडे व आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे.कोरोनाच्या काळात सर्व समाजाला आरोग्याचे महत्व पटले. परंतु काही कारणास्तव आपण आरोग्याची तपासणी करण्याचे टाळतो. तसेच विद्यार्थ्याचे शरीरात होणारे बदल व त्यावरील उपाय यावर मार्गदर्शन केले, महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी यांचे आरोग्य सुव्यवस्थित ठेवणे हे महाविद्यालयाचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन केले. या सर्व गोष्टीचा आढावा लक्षात घेता जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्याने महाविद्यालयातील कर्मचारी विद्यार्थी यांच्यासाठी आरोग्य शिबीराचे महाविद्यालयामध्ये आयोजन करण्यात आले यामध्ये वजन, उंची, शुगर, रक्तदाब लेव्हल, ऑक्सिजन लेव्हल नाडी इ. तपासणी करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी या प्रसंगी विद्यार्थांना व्यायाम व आरोग्याचे महत्व तसेच शरीर हीच खरी मणुष्याची संपत्ती आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. हरिष काळे यांनी केले. आभार डॉ. रविंद्र इचे यांनी केले. प्राथमिक आरेग्य केंद्र आसेगांव पूर्णा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. समिना खान, श्री. दिवान आरोग्य सेवक, श्रीमती. सोनोने आरोग्य सेविका इ. सहकार्य लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.











सर्व सामान्यांचा बुलंद आवाज
ब्राम्हणवाडा थडी दर्पण
दि.१३/०४/२०२२

**आसेगाव पूर्णा येथील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिवस साजरा**

कृष्णापूर
(रत्नदिप तंतरपाळे)

➢ **डॉ. पंजाबराव देशमुख यांची पुण्यतिथी महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **१० / ४ / २०२२** रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांची **५७** वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख वक्ते प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी सांगितले की, डॉ. पंजाबराव देशमुख हे प्रागतिक विचारवंत होते, अस्पृशता, वर्णव्यवस्था त्यांना मान्य नव्हती. भारताचे पहिले कृषिमंत्री, सामाजिक परिवर्तन सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात धोरणात्मक कार्य केले. शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. श्रध्दांनद वसतीगृहाची स्थापना केली, ते हाडाचे शिक्षक होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्रात आधुनिकीकरण करण्यासाठी त्यांनी कृषीशास्त्र परिषदेची स्थापना केली. असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. प्रविण सदार तसेच प्रमुख पाहूणे श्री. राहूल खाटकर यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जिवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन प्रास्ताविक व आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.






दैनिक विदर्भ संग्राम

**छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांची ५७ वी पुणयतिथी संपन्न**

कृष्णापुर – छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे दिनांक १० / ४ / २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन क रण यात आले, सुरुवातीला प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले, या कार्क्रमाचे अध्यक्ष व प्रमुख वक्ते डॉ. भारत कल्याणकर उपस्थित होते त्यांनी असे प्रतिपादन केले की, डॉ. पंजाबराव देशमुख हे ख?या अर्थाने लोकमहरशी कृषी क्रांतीचे जनक होते. त्यांनी या देशाचे मूलभूत प्रश्न जसे की शेतकरी, शिक्षण, दारिर्द्य निर्मूलन जतिभेद या सारख्या प्रश्नाना हात घातला त्यांनी शेतक्यासाठी नविन तत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून दिल्ली येथे ९० दिवसाचे कृषी प्रदर्शनीचे आयोजन केले होते. या परिषेसाठी उद्घघटन समारंभाला अमिरिकेचे अध्यक्ष व समारोपाला रशियाचे राष्ट्राध्यक्ष व मध्यंतरी इंग्लंडच्या महाराणी एलझाबेथ यांना सुद्धा निमंत्रण दिले होते असे अभुतपुर्व प्रदर्शन जगात झाले नाही. शिक्षणाचे महत्त्व जाणून त्यानी शहरात नव्हे तर ग्रामीण व अती दुर्गम भागात शाळा महविद्यालये काढून सर्वांना शिक्षण मिळविण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षणावरील खर्च सरकारने किमान राष्ट्रीय उतपन्नच्य ६/ करावा असे प्रतिपादन त्यांनी केले होते. असे मत त्यांनी मांडले. या कार्क्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रविण सदार तर प्रमुख पाहुणे राहुल खाटकर व सचिन उपस्थित होते, या कार्क्रमाचे आयोजन व सूत्रसचालन व आभार डॉ. आशिष काळे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्राम अधिकारी यांनी केले.

➢ **महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **११ / ४ / २०२२** रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची **१९५** वी जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. मनोज सपकाळ यांनी याप्रसंगी सांगितले की, पहिली शिवजयंती साजरी करणारे शिवशाहीर सत्यशोधक समाजाचे संस्थापक स्त्री शिक्षणाचे आद्यप्रणेते भारतातील पहिली मुलीची शाळा काढणारे ज्योतिबा फुले होते. त्याच बरोबर त्यांनी वर्षा पूर्वीच्या दडपलेल्या जातीचे शोषण, स्त्रीयांची गुलामगिरी व पर्यावरणाचा प्रश्न शेतकऱ्याची लुट, शिक्षण या विषयी नवे व मुलभूत विचार मांडले आणि सार्वजनिक सत्यधर्माची नवी नितिमूल्य असे सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी याप्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवणावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुत्रसंचालन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. आभार महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.





# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

वार्ताहर / १२ एप्रिल

पुर्णानगर : छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पुर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची १९५ वी जयंती नुकतीच साजरी करण्यात आली असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष हनुमंत लुंगे हे होते तर प्रमुख प्रवक्ते मनोज सपकाळ, डॉ.भारत कल्याणकर, डॉ.काळे, डॉ.इचे, प्रा.लिल्हारे, डॉ.चौधरी, मंचकावर उपस्थित होते.

सर्वप्रथम ज्योतिबा फुले यांच्या फोटोचे पुजन करून ... कार्यक्रमाला सुरूवात झाली. यावेळी मनोज सपकाळ यांनी म्हटले की, पहिली शिवजयंती साजरी करणारे शिवशाहिर सत्यशोधक, समाजाचे संस्थापक राष्ट्रपिता स्त्री शिक्षणाचा आद्य प्रणेत भारतातील पहिली मुलांची शाळा काढणारे ज्योतिबा फुल हे होते. त्याच बरोबर १०० ... शोषण, स्त्रियांची गुलामगिरी, पर्यावरणाचा प्रश्न शेतकऱ्यांची लुट, शिक्षण या विषयी नविन मुलभुत कार्यक्रमाचे संचालन डॉ. आशिष काळे यांनी केले. आभार प्रदर्शन सुवर्णा जवंजाळ यांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षण-शिक्षकेत्तर कर्मचारी स्वयम सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

➢ **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महाविद्यालयात संपन्न.**

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा राश्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक **१४/४/२०२२** रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची **१३१** वी जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. मिलिंद तायडे, इतिहास विभाग प्रमुख जगदंबा महाविद्यालय, अचलपूर यांनी या प्रसंगी सांगितले की, हजारो वर्षाच्या रूढी परंपरेच्या जोखडातून महिलांची सुटका करून त्यांची उन्नती आणि विकास साधण्यासाठी संविधानात वेगवेगळया कलमा अंतर्गत तरतुदी करूण खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांचा उध्दार केला. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार उपयुक्त आहे. कोणत्याही व्यक्तिला ध्येयाच्या दिशेने जायचे असेल तर शिका संघटीत व्हा व संघर्ष करा हा मुलमंत्र ध्येयाच्या दिशेने नेतो असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. भारत कल्याणकर यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखी दुसरी कोणतीही व्यक्ति झाली नाही म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारापासुन जग प्रेरणा घेत आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष दि. काळे यांनी केले. सुत्रसंचालन कु. मनीषा पारिसे व आभार कु. आचल नाचोने हिने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजने चे स्वयंसेवक विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.







आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !

परतवाडा टाईम्स

SOCIAL MEDIA EDITION

संपादक:-नरेश तायवाडे

RNI NO. - MAHBIL/2018/80744

दि. 19-04-2022

## छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

डॉ. आशिष दि. काळे
रासेयो कार्यक्रम अधिकारी

डॉ. सुवर्णा दे. जवंजाळ
रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी

प्राचार्य डॉ.हनुमंत लुंगे
अध्यक्ष रासेयो

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय,
आसेगाव पूर्णा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय
आसेगांव पूर्णा,
ता. चांदूर बाजार, जि.अमरावती